Annexure - X

असा. क्र. ४०

रजिस्टर्ड नं. एमएच०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मार्च ३, २००६/फाल्गुन १२, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**पर्यावरण विभाग**

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मार्च २००६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६.**

क्रमांक प्लास्टीक २००५/प्र.क्र.३८/तां.क.३.— महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ (२००६ चा महाराष्ट्र अध्यादेश ४) याच्या कलम १८ चे पोट-कलम (३) चा खंड (एक), आणि कलम ४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, प्लास्टीकच्या पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादन व वापर याकरिता पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.—** (१) या नियमांना, महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज)



[**किंमत :** रुपये ५.००]

(उत्पादन व वापर) नियम, २००६ असे म्हणावे.

(२) हे नियम, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.—** या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " पिशव्या (कॅरी बॅग्ज) " याचा अर्थ, झबला प्लास्टीकच्या पिशव्या या नावाने परिचित असलेल्या व हातात धरण्यास सोयीच्या असलेल्या, वेस्ट टाईप किंवा " डी " अक्षराच्या आकाराचे छिद्र करून हाताच्या मुठीत धरण्यायोग्य बनविलेल्या प्लास्टीकच्या पिशव्या, असा आहे,

(ख) " वस्तू " यामध्ये भाजीपाला, फळे, रसायने, खत, कापड व त्यासारख्या वस्तूंचा समावेश होतो,

(ग) " पात्र " याचा अर्थ, वस्तू साठविण्यासाठी, वाहून नेण्यासाठी किंवा देण्या-घेण्यासाठी मूळ कच्च्या मालापासून (व्हर्जिन) बनविलेले किंवा पुनर्चक्रीकरण केलेल्या प्लास्टीकपासून बनविलेले, झाकणाचे किंवा बिगर झाकणाचे लवचिक किंवा टणक पात्र, असा आहे.

(घ) " अन्नपदार्थ " याचा अर्थ प्रक्रिया केलेले व शिजवलेले आणि खाण्यासाठी तयार असलेले द्रव, भुकटी, घट्ट किंवा अर्धवट घट्ट (थलथलीत) स्वरूपातील अन्न व अन्नपदार्थ, फास्ट फूड, असा आहे,

(ङ.) " नमुना " याचा अर्थ, या नियमासोबत जोडलेला नमुना असा आहे,

(च) " अध्यादेश " याचा अर्थ, महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ (२००६ चा महाराष्ट्र अध्यादेश ४) असा आहे,

(छ) " नोंदणी " याचा अर्थ, व्हर्जिन प्लास्टीकपासून किंवा पुनर्चक्रीत प्लास्टीकपासून प्लास्टीकच्या पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) व पात्रांचे उत्पादन करणाऱ्या उद्योग घटकांची राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केलेली नोंदणी, असा आहे.

(ज) " विक्रेता " याचा अर्थ, जी खाद्यपदार्थाव्यतिरिक्त वस्तूंची व वर व्याख्या केलेल्या अन्नपदार्थांची प्लास्टीकच्या पिशव्यांमधून (कॅरी बॅग्ज) किंवा त्यात बांधून विक्री करते, अशी व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये, दुकानदार, उपहारगृहे, किरकोळ विक्रेते, पदपथावरील विक्रेते, मालसंग्राहक व घाऊक विक्रेता इ.चा समावेश होतो.

३. **अंमलबजावणी प्राधिकरण.—** या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी,—

(एक) प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादन व पुनर्चक्रीकरण यासंबंधात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व राज्य शासनाचा उद्योग विभाग ही, सक्षम प्राधिकरणे असतील.

(दोन) प्लास्टीक पिशव्यांचा (कॅरी बॅग्ज) वापर, विक्री, संग्रह, विलगीकरण, वाहतूक व विल्हेवाट यासंबंधात,—

(क) संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये, महानगरपालिका आयुक्त किंवा महानगरपालिका आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला, सहायक महानगरपालिका आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, इतर कोणताही अधिकारी, सक्षम प्राधिकारी असेल ;

(ख) संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी ;

(ग) कोणत्याही गावाने संबोधल्या जाणा-या स्थानिक प्राधिकरणांच्या क्षेत्रामध्ये, त्या स्थानिक प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

४. **पुनर्चक्रीकरण केलेल्या प्लास्टीकपासून बनविलेल्या पिशव्यांच्या (कॅरी बॅग्ज) वापरावर बंदी.**— कोणताही विक्रेता, अन्नपदार्थ साठविण्यासाठी, वाहून नेण्यासाठी, देण्यासाठी किंवा आवेष्टनासाठी पुनर्चक्रीत प्लास्टीकपासून बनविलेल्या पिशव्यांचा (कॅरी बॅग्ज) किंवा पात्रांचा वापर करणार नाही.

५. **प्लास्टीकपासून बनविल्या जाणा-या पिशव्यांच्या ( कॅरी बॅग्ज ) व पात्रांच्या उत्पादनाच्या शर्ती.**— नियम ४ च्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीस, पुढील शर्तींची पूर्तता केल्यास, प्लास्टीकपासून बनविल्या जाणा-या पिशव्यांची (कॅरी बॅग्ज) निर्मिती करता येईल,—

(एक) व्हर्जिन प्लास्टीकपासून बनविलेल्या पिशव्या (कॅरी बॅग्ज) ह्या नैसर्गिक व पांढऱ्या रंगछटेत असतील,

(दोन) पुनर्चक्रीकरण केलेल्या प्लास्टीकपासून बनविलेल्या आणि अन्नपदार्थ साठविण्याच्या व आवेष्टित करण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पिशव्यांची (कॅरी बॅग्ज) निर्मिती, ही अन्नपदार्थ, औषधी पदार्थ व पिण्याचे पाणी यांच्या संपर्कात येणा-या प्लास्टीकमध्ये वापरण्यासाठी, भारतीय मानक (आय. एस.) : ९८३३ : १९८१, रंगद्रव्ये व रंगसूचीप्रमाणे, रंगद्रव्यांचा व रंगांचा वापर करून करण्यात येईल.

६. **पुनर्चक्रीकरण.**— प्लास्टीकच्या पुनर्चक्रीकरणाचे काम भारतीय मानक ब्युरो विनिर्देश : आय. एस. : १४५३४ : १९९८, प्लास्टीकच्या पुनर्चक्रीकरणविषयक - मार्गदर्शक तत्त्वांनुसार काटेकोरपणे हाती घेण्यात येईल.

७. **चिन्हांकन किंवा सांकेतिक खुणा.**— (१) प्लास्टीकच्या पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादक, प्लास्टीकच्या पिशव्यांवर (कॅरी बॅग्ज) आणि पात्रांवर, भारतीय मानक ब्युरो यांच्या आय. एस. : १४५३४ : १९९८, प्लास्टीकच्या पुनर्चक्रीकरणविषयक मार्गदर्शक तत्त्व यानुसार चिन्ह किंवा

खूण उमटवील आणि पुनर्चक्रीकरण केलेल्या प्लास्टीकपासून बनविलेल्या अंतिम उत्पादनावर, पुनर्चक्रीकरण केलेल्या सामग्रीच्या उपयोगाच्या टक्केवारीच्या निर्देशासह " पुनर्चक्रीत " म्हणून चिन्हांकित करील.

(२) ज्यांच्याकडे छपाईची सुविधा नसेल असे प्लास्टीकच्या पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादक, प्लास्टीकच्या पिशव्या (कॅरी बॅग्ज) " पुनर्चक्रीत सामग्री " पासून किंवा " मूळ कच्च्या मालापासून (व्हर्जिन) " बनविलेल्या आहेत किंवा कसे याबाबत प्रत्येक पिशवीवर (कॅरी बॅग्ज) पक्क्या शाईने ठसा उमटवतील.

(३) पोट-नियम (१) किंवा, यथास्थिती, पोट-नियम (२) खालील पूर्ततांखेरीज, प्रत्येक पिशवीवर (कॅरी बॅग्ज) व आवेष्टनावर खालील बाबींदेखील मुद्रित करण्यात किंवा पक्क्या शाईच्या ठशाने उमटवण्यात येतील :—

(एक) उत्पादकाचे नाव व पत्ता ;

(दोन) राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा नोंदणी क्रमांक ;

(तीन) राज्याच्या उद्योग विभागाचा नोंदणी क्रमांक ;

(चार) पिशवीची (कॅरी बॅग्ज) जाडी ; आणि

(पाच) शंभर पिशव्यांच्या (कॅरी बॅग्ज) गठ्ठ्याचे वजन.

८. **पिशव्यांची (कॅरी बॅग्ज) जाडी.**— (१) व्हर्जिन किंवा पुनर्चक्रीत प्लास्टीकपासून बनविलेल्या पिशव्यांची (कॅरी बॅग्ज) किमान जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी आणि आकार ८×१२ इंचापेक्षा कमी असणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती , व्हर्जिन किंवा पुनर्चक्रीत प्लास्टीकपासून बनविलेल्या ज्या पिशव्यांचा (कॅरी बॅग्ज) आकार ८×१२ इंचापेक्षा (२०×३० सें.मी.पेक्षा) कमी असेल आणि जाडी, पोट-नियम १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या किमान जाडीपेक्षा कमी असेल अशा पिशव्यांची (कॅरी बॅग्ज) निर्मिती, संग्रह, वितरण किंवा विक्री करणार नाही.

९. **विवक्षित व्यक्तींकडून स्वयंनियमन.**— नियम ३ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाधा न आणता प्लास्टीक उद्योग संघाला, त्यांच्या सदस्य घटकांमार्फत स्वयंनियामक उपाय योजता येतील.

१०. **अहवाल.**— अंमलबजावणी प्राधिकरणे, त्यांना लागू असेल त्यानुसार, नमुना " अ " व " ब " मध्ये राज्य शासनाला, त्यांचा त्रैमासिक अहवाल सादर करतील.

## नमुना " अ "

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (म.प्र.नि.मंडळ) आणि उद्योग विभाग यांनी सादर करावयाच्या अहवालाचा नमुना

(१) अहवालाचा कालावधी :

(२) प्लास्टीक पिशवी आणि प्लास्टीक शिट उत्पादन करणाऱ्या नोंदणीकृत उत्पादकांची संख्या :

(२.१) उद्योग संचालनालय :

| उद्योग संचालनालय | उत्पादन क्षमता मेट्रीक टन प्रतिदिन | चालू उद्योग | बंद उद्योग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| तात्पुरती नोंदणी झालेल्या लघु उद्योगांची संख्या . . | | | | |
| कायम स्वरूपी नोंदणीकृत लघु उद्योगांची संख्या . . | | | | |
| आय. ई. एम कडे नोंदणी झालेल्या उद्योग घटकांची संख्या . . | | | | |
| एकूण . . | | | | |

२.२. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ :

| प्रादेशिक विभाग | उत्पादन क्षमता मेट्रीक टन प्रतिदिन | चालू उद्योग | बंद उद्योग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| नोंदणीकृत उद्योग घटकांची संख्या . . | | | | |
| वैध कन्सेंट टू ऑपरेट असलेल्या उद्योग घटकांची संख्या . . | | | | |
| एकूण . . | | | | |

३. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या :—

| प्रादेशिक विभाग | आपसात मिटविण्यात आलेली प्रकरणे | | तिसरा गुन्हा | न्यायालयात दाखल प्रकरणांची संख्या | न्यायप्रविष्ठ प्रकरणांची संख्या | वसूल केलेल्या दंडाची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पहिला गुन्हा | दुसरा गुन्हा | | | | | |
| १ | | | | | | | |
| प्रादेशिक विभागाची एकूण | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| प्रादेशिक विभागाची एकूण | | | | | | | |
| एकूण निव्वळ | | | | | | | |

४. अन्य काही माहिती.

विभाग प्रमुखाची स्वाक्षरी

## नमुना " ब "

## महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्यधिकारी यांनी सादर करावयाच्या अहवालाचा नमुना

(१) अहवालाचा कालावधी : पासून पर्यंत

(२) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे नांव व पत्ता :-

(३) अध्यादेश अंतर्गत प्रकाशित झालेल्या नियमांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव :-

(४) दूरध्वनि क्रमांक (निवासी / कार्यालयीन) :-

(५) कार्यक्षेत्रात नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे दाखल झालेल्या प्रकरणांची संख्या :-

| कार्यक्षेत्र | आपसात मिटविण्यात आलेली प्रकरणे पहिला गुन्हा | आपसात मिटविण्यात आलेली प्रकरणे दुसरा गुन्हा | तिसरा गुन्हा | न्यायालयात दाखल प्रकरणांची संख्या | न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या | वसूल केलेल्या दंडाची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| विभागाची एकूण .. | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| विभागाची एकूण .. | | | | | | | |
| कार्यक्षेत्रातील एकूण निव्वळ | | | | | | | |

(६) नियमांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी हाती घेतलेल्या विशेष मोहिमेची सविस्तर माहिती :--

(७) पहिला गुन्हा आणि दुसरा गुन्हा करणाऱ्यांची यादी :--

(८) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची त्यांच्या कार्यक्षेत्रात जनजागृतीसाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती :--

(९) तत्संबंधीची माहिती :--

विभाग प्रमुखाची स्वाक्षरी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शर्वरी गोखले,**
शासनाचे प्रधान सचिव.

## ENVIRONMENT DEPARTMENT

New Administrative Building, Opposite Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd March 2006.

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA NON-BIODEGRADABLE GARBAGE (CONTROL) ORDINANCE, 2006.

No. Plastic 2005/CR-38/TC3.— In exercise of the powers conferred by clause (*i*) of sub-section (*3*) of section 18 read with sub-sections (*1*) and (*2*) of section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Ordinance, 2006 (Mah. Ord. IV of 2006), the Government of Maharashtra hereby makes the following rules for the manufacture and use of plastics cary bags, namely :—

1. *Short title and commencement.-* (1) These rules may be called the Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture and Usage) Rules, 2006.

(2) They shall come into force with effect from the date of their publication in the *Maharashtra Government Gazette.*

2. *Definitions.*—In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " carry bags " means plastic bags which have a self carrying feature commonly known as vest type bags or any other feature used to carry commodities such as " D " punched bags ;

(*b*) " commodities " includes articles such as vegetables, fruits chemicals, fertilizers, textile and the like ;

(*c*) " container " means flexible or rigid containers made of virgin plastics or recycled plastics with or without lid used to store, carry or dispense commodities ;

(*d*) " foodstuffs " means ready-to-eat food and food products ; fast food, processed and cooked food in liquid, powder, solid or semi-solid form ;

(*e*) " Form " means the form appended to these rules ;

(*f*) " Ordinance " means the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Ordinance, 2006 (Mah. Ord. IV of 2006) ;

(*g*) " registration " means registration of units manufacturing carry-bags and containers made of virgin or recycled plastics with the State Pollution Control Board ;

(*h*) "vendor" means person who sells nonfood stuff items, foodstuffs as defined above, packaged and stored in plastic carry bags, and includes shopkeepers, restaurants, retailers, street vendors, stockiest, etc.

3. *Enforcing Authority.*—The authority competent for enforcement of the provisions of these rules,—

(*i*) related to manufacture and recycling shall be the State Pollution Control Boards and Industries Department of the State Government ;

(*ii*) related to the use, sell, collection, segregation, transportation and disposal shall be,—

(*a*) the Municipal Commissioner or any other Officer nominated by the Municipal Commissionner, not below the rank of Assistant Municipal Commissioner, within the areas of their respective Municipal Corporations ;

(*b*) the District Collector of the concerned district ;

(*c*) the Chief Executive Officer of the local authorities, by whatever name called, for such areas.

4. *Prohibition of usage of carry bags–made of recycled plastics.*—No vendor shall use carry bags or containers made of recycled plastics for storing, carrying, dispensing, or packaging of foodstuffs.

5. *Conditions of Manufacture of carry bags and containers, made of plastics.*—Subject to the provisions of rule 4 or any other law for the time being in force, any person may manufacture carry bags made of plastics if the following conditions are satisfied, namely :—

(*i*) Carry bags made of virgin plastic shall be in natural shade or white ;

(*ii*) Carry bags made of recycled plastic and used for purposes other than storing and packaging foodstuffs shall be manufactured using pigments colourants as per IS : 9833 : 1981 entitled "List of pigments and colourants for use in plastics."

6. *Recycling.*—Recycling of plastics shall be undertaken strictly in accordance with the Bureau of Indian Standards specification : IS 14534 : 1998 entitled "The Guidelines for Recycling of Plastics".

7. *Marking or codification.*—(1) Manufacturers of plastic carry bags shall mark or code carry bags and containers as per Bureau of Indian Standard Specification : IS 14534 : 1998 entitled "The Guidelines for Recycling of Plastics" and the end product made out of recycled plastics shall be marked as "recycled" along with the indication of the percentage of use of recycled material.

(2) The manufacturers of plastic carry bags, who do not have printing facilities, shall put stamp with permanent ink on each of carry bags as to whether these are made of "recycled material" or of "virgin plastic".

(3) In addition to the requirements under sub-rule (1) or, as the case may be sub-rule (2), there shall also be printed or stamped on each bag and package,—

(*i*) Name and address of manufacturer ;

(*ii*) Registration number of the State Pollution Control Board ;

(*iii*) Registration number of Industries Department of the State ;

(*iv*) Thickness of the bag ; and

(*v*) Weight of 100 bags on package.

8. *Thickness of carry bags.*—(1) The minimum thickness of carry bags made of virgin plastics or recycled plastics shall not be less than 50 microns and of the size of 8 × 12 inches.

(2) No person shall manufacture, stock, distribute or sell carry bags made of virgin or recycled plastic bags which are less than 8 × 12 inches (20 × 30 cms.) in size and which do not conform to the minimum thickness specified in sub-rule (1).

9. *Self-regulation by certain persons.*—Without prejudice to the provisions contained in rule 3, the Plastics Industry Association, through their member units, may undertake self-regulatory measures.

10. *Report.*—The enforcing authorities shall submit their reports quarterly to the State Government in Forms A and B as applicable.

# FORM A

## [Shall be submitted by Maharashtra Pollution Control Board (MPCB) and Industries Department]

1. Period of the Report :—
2. Number of Plastic Bags and Sheet Manufacturers registered with the agency :—

2.1 From Directorate of Industries :

| Directorate of Industries | Production Capacity MT/D | In Operation | Closed | Remarks |
|---|---|---|---|---|
| Number of units with temporary SSI Registration. | | | | |
| Number of units with permanent SSI Registration. | | | | |
| Number of Units with IEM. | | | | |
| Total . . | | | | |

2.2. Report from Maharashtra Pollution Control Board :

| Region | Production Capacity MT/D | In Operation | Closed | Remarks |
|---|---|---|---|---|
| Number of units registered. | | | | |
| Number of Units with with valid "Consent to Operate". | | | | |
| Total . . | | | | |

3. Number of cases registered against Manufacturers for violation of Rules :

| Region | Compounding | | Third Offence | Number of cases filed in Court | Number of cases subjudiced | Amount of fine collected | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | First Offence | Second Offence | | | | | |
| 1 | | | | | | | |
| Division Sub-Total | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| Division Sub-Total | | | | | | | |
| Grand Total | | | | | | | |

4. Any other information

(Signature of the Head of the Organisation)

FORM B

**(Shall be submitted by Municipal Commissioner, District Collector and Chief Officers)**

1. Period of Report : From __________ To __________
2. Name and address of the enforcing agency :
3. Name of Officer In-Charge of enforcement of the Rules under Ordinance :
4. Phone Number (Office and Residence) :
5. Number of cases registered in the Jurisdiction for violation :

| Jurisdiction | Compounding | | Third Offence | Number of cases filed in Court | Number of cases subjudiced | Amount of fine collected | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | First Offence | Second Offence | | | | | |
| 1 | | | | | | | |
| Sub-Total | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| Sub-Total | | | | | | | |
| Grand Total | | | | | | | |

6. Details of special drives undertaken for effective implementation of the rules. :
7. List of first time Offenders and second time Offenders :
8. Details of Public awareness programmes conducted by enforcing agency in their jurisdiction. :
9. Any other relevant information :

(Signature of the Head of the Organisation)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHARWAREE GOKHALE,
Principal Secretary to Government.

## पर्यावरण विभाग, मंत्रालय

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ मार्च, २००६.

## अधिसूचना

**महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६.**

क्रमांक प्लास्टीक २००५/प्र.क्र.३८/तां.क.३.—महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ याच्या कलम १८, पोट-कलम (१) व पोट-कलम (३), खंड (एक) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, यांद्वारे, अविघटनशील घन कचरा योग्य व शास्त्रशुद्ध पद्धतीने गोळा करणे, वेगळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे यांसाठी पुढील नियम करीत आहे आणि ते प्रथमच करण्यात येत आहेत, ते असे :—

१. **संक्षिप्त नाव, प्रयुक्ति व प्रारंभ.**—(१) या नियमांना, महाराष्ट्र (महानगरपालिका क्षेत्रातील अविघटनशील घन कचरा योग्य व शास्त्रशुद्ध पद्धतीने संकलन करणे, विलगीकरण करणे व विल्हेवाट लावणे) नियम, २००६, असे म्हणावे.

(२) ते राज्यातील महानगरपालिका क्षेत्रांना लागू होतील.

(३) ते तात्काळ अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " विल्हेवाट " याचा अर्थ, मलप्रणाल, गटारे, नाले तुंबण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि परिसरातील हवा दूषित होण्यास प्रतिबंध करण्यासाठी योजण्यात आलेल्या विनिर्दिष्टीत उपाययोजनांनुसार योग्य व शास्त्रशुद्ध पद्धतीने अविघटनशील घन कचऱ्याची लावण्यात आलेली अंतिम विल्हेवाट, असा आहे ;

(ख) " नमुना " याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे ;

(ग) " कचरा करणाऱ्या व्यक्ती / कचऱ्याचे जनक " याचा अर्थ, अविघटनशील घन कचरा करणाऱ्या व्यक्ती किंवा आस्थापना, असा आहे;

(घ) " महानगरपालिका " याचा अर्थ, संबद्ध संविधीखाली घटित करण्यात आलेली महानगरपालिका आणि ज्या ठिकाणी नगरपालिकेच्या एजन्सीकडे घन कचऱ्याचे व्यवस्थापन व हाताळण यांचे काम सोपविण्यात येते अशी एजन्सी, असा आहे ;

(ङ) " अविघटनशील घन कचरा संकलन व विलगीकरण करण्याची केंद्रे " याचा अर्थ,—

अविघटनशील घन कचरा योग्य रीतीने संकलन करण्यासाठी, त्याचे विलगीकरण करण्यासाठी व त्याचे पृथक्करण करण्यासाठी महानगरपालिकेने उभारलेले केंद्र किंवा महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रातील अशासकीय संघटनेसह अन्य कोणत्याही एजन्सीच्या मदतीने उभारलेले कचरा संकलन व विलगीकरण करण्यासाठी उपलब्ध करून दिलेली सुविधा, असा आहे ;

(च) " अध्यादेश " याचा अर्थ, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ (२००६चा महा.अध्या.चार), असा आहे ;

(छ) " संस्करण " याचा अर्थ, अविघटनशील घन कचऱ्याचे नवीन किंवा पुनर्चक्रीत उत्पादनात रुपांतर करण्याची प्रक्रिया, असा आहे ;

(ज) " पुनर्चक्रीकरण " याचा अर्थ, मूळ उत्पादित पदार्थांसारखे असलेले किंवा नसलेले नवीन उत्पादित पदार्थ तयार करण्यासाठी विलगीत अविघटनशील कचऱ्याचे कच्च्या मालात रुपांतर करण्याची प्रक्रिया, असा आहे ;

(झ) " अनुसूची " याचा अर्थ, या नियमांना जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ञ) " पृथक्करण करणे " याचा अर्थ, अविघटनशील घन कचरा वेगळा करून त्याचे पुनर्चक्रीकरणासाठी योग्य असलेला व पुनर्चक्रीकरणासाठी अयोग्य असलेला कचरा, असे गट पाडणे, असा आहे ;

(ट) " साठवण " याचा अर्थ, कचरा अस्ताव्यस्त टाकणे, त्याठिकाणी रोगवाहक जंतूंचा प्रादुर्भाव व प्रसार होणे, मोकाट जनावरे फिरणे व अत्याधिक दुर्गंधी निर्माण होणे यास प्रतिबंध होईल अशा रीतीने अविघटनशील घन कचरा तात्पुरता साठवून ठेवणे, असा आहे ;

(ठ) " कचरा कुंडी " याचा अर्थ, कचरा अस्ताव्यस्त टाकणे, त्याठिकाणी रोगवाहक जंतूंचा प्रादुर्भाव व प्रसार होणे, मोकाट जनावरे फिरणे आणि अत्याधिक दुर्गंधी निर्माण होणे यांस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, कचरा गोळा करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी किंवा इतर कोणत्याही सोयीच्या ठिकाणी कचरा अस्ताव्यस्त टाकण्यास प्रतिबंध करण्यासाठी झाकण असलेली तात्पुरती सामाईक कचराकुंडी, असा आहे;

(ड) " वाहतूक " याचा अर्थ, कचऱ्याची दुर्गंधी निर्माण न होता, तो अस्ताव्यस्त न टाकता व भयंकर व सहजपणे फैलावणाऱ्या जंतूंचा प्रसार न होता, कचऱ्याची आरोग्यदृष्ट्या सुरक्षित अशा रीतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करण्यासाठी खास तयार करण्यात आलेल्या वाहतूक व्यवस्थेमार्फत केलेली वाहतूक, असा आहे ;

(ढ) " जमिनीमध्ये कचरा भरणे " याचा अर्थ, भूजल, भूपृष्ठजल प्रदूषित होऊ नये तसेच हवेतून धुलिकण इतस्तत: पसरू नये, वाऱ्याने कचरा अस्ताव्यस्त पसरू नये, दुर्गंधी निर्माण होऊ नये, आगीचा धोका उद्‌भवू नये, पक्ष्यांना त्रास होऊ नये, उपद्रवी कीटकांचा किंवा उंदरांचा त्रास होऊ नये, ग्रीनहाऊसमधून होणाऱ्या उत्सर्जित वायुमुळे हानी पोचू नये, जमीन ओबडधोबड होऊ नये व तिची झीज होऊ नये यादृष्टीने संरक्षक उपाय योजून तयार करण्यात आलेल्या सुविधांद्वारे जमिनीवर अवशिष्ट घन कचऱ्याची विल्हेवाट लावणे, असा आहे ;

(न) " विलगीकरण " याचा अर्थ, नागरी घनकचऱ्याचे कार्बनिक, अकार्बनिक, पुनर्चक्रणायोग्य आणि घातक घन कचरा असे वेगळेवगळे कचऱ्याचे गट पाडणे.

३. **महानगरपालिकांची जबाबदारी.**—(१) महानगरपालिका, आपल्या प्रादेशिक क्षेत्राच्या हद्दींमध्ये, या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आणि अविघटनशील घन कचरा गोळा करणे, तो वेगळा करणे, त्याची साठवण करणे, त्याचे विलगीकरण करणे, तो वाहून नेणे, त्याच्यावर प्रक्रिया करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे यासाठीच्या कोणत्याही पायाभूत सुविधेचा विकास करण्यासाठी जबाबदार असेल.

(२) महानगरपालिका,—

(एक) अशासकीय संघटनांसह आणि स्वयं सहाय्य गटांसह कोणत्याही अभिकरणाच्या मदतीने, प्रत्येक प्रभागामध्ये, विविध ठिकाणी, क्षेत्रांमधील कचरा निर्मितीच्या अंदाजित प्रमाणावर आणि लोकसंख्येच्या घनतेवर आधारित, अविघटनशील कचरा संकलन व विलगीकरण करणारी केंद्रे उभारील.

(दोन) कचरा संकलन करण्याच्या प्रत्येक केंद्रावरील टाकाऊ घन कचऱ्याचे विलगीकरण करील;

(तीन) चिंध्या गोळा करणाऱ्यांना टाकाऊ घन कचरा वेगळा करण्याची आणि असा कचरा संकलन करण्याऱ्या ज्या केंद्रांमधून अविघटनशील टाकाऊ पदार्थ घेऊन जाण्याची मुभा देईल ;

(चार) टाकाऊ घनकचऱ्याचे प्रकारानुसार वर्गीकरण आणि विलगीकरण करण्याचे काम करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून योग्य व पुरेशा जागेची तरतूद करील ;

(पाच) सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याच्या प्रयोजनासाठी ठेवण्यात आलेल्या कचराकुंडीमधील अविघटनशील व विघटनशील घन कचऱ्याची सरमिसळ टाळण्यासाठी उचित व्यवस्थेची तरतूद करील;

(सहा) सार्वजनिक ठिकाणांवरील कचऱ्याची सरमिसळ होऊ नये आणि कचरा खाली सांडू नये यासाठी सार्वजनिक ठिकाणी विघटनशील व अविघटनशील कचऱ्याकरिता वेगवेगळ्या रंगांच्या किमान दोन स्वतंत्र कचराकुंड्या ठेवील आणि सार्वजनिक ठिकाणी या प्रयोजनासाठी ठेवलेल्या कचरा कुंड्याकरिता ठराविक सांकेतिक रंग ठरवून देईल ;

(सात) अविघटनशील व विघटनशील टाकाऊ घन कचरा वाहून नेताना त्यांची सरमिसळ टाळण्यासाठी, असा कचरा वाहून नेण्यासाठी योग्य वाहनांचा वापर करील व अशा वाहनांची तरतूद करील. कचरा वाहून नेताना तो रस्त्यावर सांडू नये म्हणून कचरा वाहून नेणारे वाहन योग्यरित्या झाकलेले असेल ;

(आठ) राज्य प्रदूषण मंडळाशी विचारविनिमय करून, पुनर्चक्रीकरण किंवा प्रक्रिया करण्याकरिता योग्य नसतील असे अविघटनशील टाकाऊ घन कचरा व इतर टाकाऊ घनकचरा पुरण्यासाठी, विशेष करून नेमून देण्यात आलेल्या व केवळ असाच टाकाऊ घन कचरा पुरण्यासाठी राखून ठेवलेल्या जागेची तरतूद करील आणि असा घन कचरा जमिनीत भरण्याचे काम योग्य रितीने व शास्त्रीय पद्धतीने करण्यात येईल ;

(नऊ) मलप्रवाहांमधून, गटारांमधून आणि नाल्यांमधून खणून काढण्यात आलेला टाकाऊ घन कचरा व ढिगारे यांचे आणि अविघटनशील टाकाऊ घनकचऱ्याच्या संबंधात महानगरपालिका क्षेत्रातील एकूणच गोळा करण्यात आलेल्या घन कचऱ्याचे प्रतिष्ठित संस्था किंवा संघटना यांच्यामार्फत प्रतिवर्षी शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करतील अशा अविघटनशील टाकाऊ घन कचऱ्याची वस्तुनिहाय विल्हेवारी /

वर्गीकरण देखील करण्यात येईल. असा विश्लेषण अहवाल राज्य शासनाला प्रत्येक वर्षाच्या १५ जून रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यात येईल ;

(दहा) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे अनुपालन करील.

४. **मालक, भोगवटादार, सहकारी संस्था इत्यादींची जबाबदारी.**—(१) महानगरपालिका क्षेत्रातील जागा, सहकारी गृहनिर्माण संस्था, हॉटेले, वाणिज्यिक आस्थापना, दुकाने यांचे मालक किंवा भोगवटादार हे आपापल्या जागांमध्ये निर्माण झालेले विघटनशील व अविघटनशील टाकाऊ पदार्थ गोळा करण्यासाठी, महानगरपालिकेने विनिर्दिष्ट केलेल्या वेगवेगळ्या रंगांच्या किमान दोन स्वतंत्र कचराकुंड्या ठेवतील.

(२) बांधकामासाठी दगडमातीचा कचरा मोऱ्या, गटारे, नाले, पाणथळ जमिनी व पडीत जमिनी यामध्ये फेकता येणार नाही; आणि संबंधित व्यक्तीला तो कचरा स्वतंत्रपणे महानगरपालिकेच्या स्वाधीन करावा लागेल.

पोट-नियम (२) च्या तरतुदीस बाधा न आणता संबंधित व्यक्ती, बांधकामातील दगडमातीच्या योग्य व शास्त्रशुद्ध विल्हेवाटीसाठी महानगरपालिकेची परवानगी घेईल.

५. **व्यावृत्ती.**—या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास महानगर पालिका जेव्हा, कचरा गोळा करीत असेल व त्याची वाहतूक करण्याच्या दरम्यान, केव्हाही व कुठेही, विघटनशील व अविघटनशील टाकाऊ पदार्थ एकत्र मिसळले जाणार नाहीत अशाप्रकारे कचऱ्याच्या मूळ ठिकाणापासून कचरा गोळा करीत असेल त्याठिकाणांना किंवा क्षेत्रांना नियम ३ चा पोट-नियम (२), खंड (सात) व नियम ४ यांच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

## अनुसूची

[नियम ३ (२) (दहा) व ४ पहा]

**अंमलबजावणी वेळापत्रक**

| अनुक्रमांक | अनुपालनाचे निकष | कालमर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अविघटनशील टाकाऊ घनकचरा संकलन व विलगीकरण करणारी (कचऱ्याचे संकलन करणारी) केंद्रे उभारणे. | १ एप्रिल, २००६ पर्यंत किंवा त्यापूर्वी. |
| २ | सार्वजनिक ठिकाणी रंगीत कचरा कुंड्या ठेवणे | १ एप्रिल, २००६ पर्यंत किंवा त्यापूर्वी. |
| ३ | सहकारी गृहनिर्माण संस्था, हॉटेले, वाणिज्यिक आस्थापना, दुकाने याठिकाणी रंगीत कचरा कुंड्या ठेवणे. | १ एप्रिल, २००६ पर्यंत किंवा त्यापूर्वी. |
| ४ | राज्य शासनाला पाठवावयाचा कामाचा अहवाल | वर्षाच्या प्रत्येक तिमाहीच्या शेवटी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शर्वरी गोखले,**
शासनाच्या प्रधान सचिव.

## ENVIRONMENT DEPARTMENT

New Administrative Building, Opposite Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 3rd March 2006.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA NON-BIODEGRADABLE GARBAGE (CONTROL) ORDINANCE, 2006.

No. PLASTIC 2005/CR38/TC3.- In exercise of the powers conferred by clause (i) of sub-section (*3*) and sub-section (*1*) of section 18 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Ordinance, 2006 (Mah. Ord. IV of 2006), the Government of Maharashtra hereby makes the following rules for proper and scientific collection, sorting and disposal of non-biodegradable solid waste, the same having been made for the first time, namely :—

1. *Short title, application and commencement.*—(1) These rules may be called the Maharashtra Non-Biodegradable Solid Wastes (Proper and Scientific Collection, Sorting and Disposal in the areas of the Municipal Corporations) Rules, 2006.

(2) They shall apply to the areas of the Municipal Corporations in the State.

(3) They shall come into force at once.

2. *Definitions.*—(I) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " Disposal " means final proper and scientific disposal of non-biodegradable solid waste in terms of the specified measures to prevent blockage of sewers, gutters, nallahs and to prevent contamination of ambient air quality ;

(*b*) " Form " means the Form appended to these rules ;

(*c*) " Generator of wastes " means persons or establishments generating non-biodegradable solid wastes ;

(*d*) " Municipal Corporation " means Municipal Corporation constituted under the relevant statutes and where the management and handling of municipal solid waste is entrusted to an agency such agency ;

(*e*) " Non-Biodegradable Waste Collection Centers " means a center for proper collection, segregation and sorting of non-biodegradable solid waste set up by Municipal Corporation or facilitated by Municipal Corporation with the help of any other agency including Non Governmental Organisation in the Municipal area ;

(*f*) " Ordinance " means the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Ordinance, 2006 (Mah. Ord. IV of 2006) ;

(*g*) " processing " means the process by which non-biodegradable solid wastes are transformed into new or recycled products ;

(*h*) " recycling " means the process of transforming segregated non-biodegradable solid wastes into raw materials for producing new products, which may or may not be similar to the original products ;

(*i*) " Schedule " means the Schedule appended to these rules ;

(*j*) " sorting " means to separate the non-biodegradable solid wastes into groups of recyclable and non-recyclable wastes ;

(*k*) " storage " means the temporary containment of non-biodegradable solid wastes in a manner so as to prevent littering, attraction to vectors, and stray animals and excessive foul odour ;

(*l*) " receptacle " means the temporary common bin, with a cap or covering facility to prevent the littering, placed at public place or any other convenient place for collection of waste in a manner so as to prevent littering, attraction of vectors, stray animals and excessive foul odour ;

(*m*) " transportation " means conveyance of wastes from place to place hygienically through specially designed transport system so as to prevent foul odour, littering, unsightly conditions and accessibility to vectors ;

(*n*) " landfilling " means disposal of residual solid wastes on land in a facility designed with protective measures against pollution of ground water, surface water and air fugitive dust, wind-blown litter, bad odour, fire hazard, bird menace, pests or rodents, greenhouse gas emissions, slope instability and erosion ;

(*o*) "segregation " means to separate the municipal solid wastes into the groups of organic, inorganic, recyclable and hazardous wastes.

(II) Words and expressions used but not defined herein shall have their respective meaning as assigned to them in the Ordinance.

3. *Responsibility of Municipal Corporations.*—(1) The Municipal Corporations shall within limits its the territorial area, be responsible for the implementation of the provisions of these rules and for any infrastructure development for collection, sorting, storage, segregation, transportation, processing and disposal of non-biodegradable solid wastes.

(2) The Municipal Corporation shall,—

(*i*) with the help of any agency including Non Governmental Organisations and self help groups set up Non-biodegradable Waste Collection Centers at various places in each ward depending upon the estimated quantum of waste generation in the area and density of population ;

(*ii*) carry out segregation of waste at every collection center ;

(*iii*) permit the rag pickers to separate the waste and to take away non-biodegradable waste from such collection centers ;

(*iv*) provide enough space to deal with and enable categorywise sorting and segregation of waste ;

(*v*) provide appropriate arrangement to avoid mixing of non-biodegradable and biodegradable solid waste at receptacles placed for this purpose at public places ;

(*vi*) place a minimum of two separate receptacles of different colours for biodegradable and non-biodegradable garbage at public place to prevent mixing and spilling of the garbage at the public places and maintain uniform colour code system for the receptacles placed at public places for this purpose ;

(*vii*) use and provide proper vehicles for transportation of such garbage so as to avoid mixing of non-biodegradable and biodegradable waste during its transportation. Transportation vehicle shall also be covered appropriately to avoid the spillage of garbage on the roads during transportation ;

(*viii*) in consultation with State Pollution Control Board provide specially designed landfill site restricted to non-biodegradable inert waste and other wastes that are not suitable for recycling or for any processing and that the land filling shall be carried out in proper and scientific manner ;

(*ix*) through reputed institute or organization scientifically analyze each year, waste and debris excavated / removed from sewers, gutters and nallahs and total solid waste collected in a corporation area with respect to non-biodegradable waste. Itemwise categorization / classification of such non-biodegradable waste shall also be carried out. Such analysis report shall be submitted to State Government on or before the 15th day of June every year ;

(*x*) comply with the time limit specified in Schedule.

4. *Responsibility of owners, occupiers, co-operative societies, etc.*—(1) The owner or occupier of the premises, co-operative housing societies, hotels, commercial establishments, shops in the Municipal Corporation area shall place a minimum of two separate receptacles of different colours, specified by the Municipal Corporation, for collecting biodegradable and non-biodegradable waste generated in their respective premises.

(2) Construction garbage shall not be thrown in the drains, sewers, nallas, wetlands and wastelands and shall be handed over by the person concerned separately to the Corporation.

(3) Without prejudice to the provisions of sub-rule (2) the person concerned may obtain permission of the Municipal Corporation for appropriate and scientific disposal of such debris.

5. *Saving.*—The provisions of clause (vii) of sub-rule (2) of rule 3 and rule 4 shall not apply to such places or areas, where on the date of commencement of these rules, the Municipal Corporation is collecting the garbage from its primary source in a way that the biodegradable and non biodegradable waste is not mixed, at any point, during collection and transportation.

*SCHEDULE*

[*See* rules 3 (2) ($x$) and 4]

**Implementation Schedule**

| Serial No. (1) | Compliance Criteria (2) | Time limit (3) |
|---|---|---|
| 1 | Setting up of non-biodegradable waste collection centers. | By 1st April, 2006 or earlier |
| 2 | Setting up of coloured receptacles at public places | By 1st April, 2006 or earlier |
| 3 | Setting up of coloured receptacles at Co-operative Housing Societies, Hotels, Commercial Establishments, Shops. | By 1st April, 2006 or earlier |
| 4 | Performance Report to be sent to State Government. | At the end of every quarter of the year. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHARWAREE GOKHALE,
Principal Secretary to Government.

## Annexure XI

No. BO/P&L Divn.II/B- 1939 -1 to 444 Dated :- 14-03-2006

To,

The Occupier,

Sub : Implementation of the Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture & Usage) Rules, 2006.

Ref :
1. Maharashtra Non-biodegradable Garbage (Control) Ordinance,2006, (issued on 27th Feb. 2006).
2. The Maharashra Plastic Carry Bags (Manufacture & Usage ) Rules, 2006 (Notification dated 3rd March,2006).
3. Public Notice issued in leading news-papers on 14th March,2006.

……

WHEREAS, during the torrential rain in various parts of Maharashtra including Mumbai on 26th July,2005 the gutters, sewers and drains were blocked due to unscientific disposal of non-biodegradable garbage especially plastic bags. AND WHEREAS, in order to prevent reoccurrence of such incidences, the Government of Maharashtra has decided to prevent throwing or depositing non-biodegradable garbage in public drains, road, water bodies etc. and also decided to regulate the use of non-biodegradable material.

AND WHEREAS, to achieve this objective, an ordinance was promulgated viz. Maharashtra Non-biodegradable Garbage (Control) Ordinance, 2006 on 27th Feb. 2006 (the said Ordinance).

AND WHEREAS, the Environment Department, Govt. of Maharashtra in exercise of the powers conferred by clause(i) of sub-section (3) of section 18 of the said Ordinance framed the "Maharashra Plastic Carry Bags (Manufacture & Usage ) Rules, 2006 vide Notification dated 3rd March, 2006" (the said rules) to regulate the manufacture and use of plastic carry bags and containers.

AND WHEREAS, the Maharashtra Pollution Control Board (MPCB) is one of the enforcing authorities with regard to manufacture and recycling of plastic bags and containers. AND WHEREAS, under the said rules, the minimum thickness of carry bags made of virgin or recycled plastics has been specified as not less than 50 microns and of the size of 8 x 12 inches. AND WHEREAS, the manufacturers manufacturing such plastic carry bags and containers are required to get themselves registered with MPCB.

AND WHEREAS, MPCB has issued a public notice in leading newspapers on 14th March , 2006 for the information of all concern and public at large bringing to their notice the provisions of the said rules.

NOW THEREFORE, you are hereby called upon to make an application for grant of registration under the provisions of the said rules in the prescribed form alongwith a Demand Draft for Rs. 500/- being the processing fees in favour of 'Maharashtra Pollution Control Board, Mumbai'. The application form may be collected from the MPCB's office or can be downloaded from our website **http://mpcb.mah.nic.in.** The application complete in all respect shall be submitted to this office on or before 1st April, 2006

This is issued with the approval of Member Secretary.

Sd/-

( A. B. Jain )
Sr. Law Officer.

Copy f.w.cs. to –

1. The Director of Industries, Industries Department, Govt. of Maharashtra, New Admn. Bldg., Opp. Mantralaya, Mumbai-32, for information.
2. The Municipal Commissioner,
   Municipal Corporation of …………………. for favour of information.
3. The District Collector- -…………., for favour of information.

Copy for information and follow up to –

Regional Officer, MPCB…………

Sub-Regional Officer, MPCB …………